तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड या प्रक्षेत्रावर रुपांतर करून शासकीय फळरोपवाटिका स्थापन करणेस मान्यता मिळणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक:- फरोवा-२०२५/प्र.क्र.२१०/१३-अे,(E-१३७४९६१)**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- २५ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ:-** संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे क्र.कृआ/फलो-२/शारोवा/रुपांतरण/प्र.क्र.-९९२८/र.३९१, दि.११.०९.२०२५

**प्रस्तावना:-**

तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड या प्रक्षेत्राचे रुपांतर करून शासकीय फळरोपवाटिका स्थापन करणेबाबत चा प्रस्ताव विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे यांच्याकडून प्राप्त झाला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर कलमे/रोपांची मागणी असल्याने कलमा/रोपांची गरज भागविण्यासाठी तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड या केंद्रावर रोपवाटीका स्थापन करण्याची नितांत गरज आहे. तसेच या प्रक्षेत्रावर रोपवाटीका स्थापन केल्यास परिसरातील शेतकऱ्यांना कलमा/रोपांची उपलब्धता होऊन फळबाग लागवड क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ होईल, त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती उंचावण्यास मदत होईल. प्रक्षेत्रास कलम/रोपे विक्रीपासून आर्थिक फायदा होईल. परिणामत: आजूबाजूच्या परिसरातील स्थानिक मजुरांना मोठया प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. सदर प्रक्षेत्रावर सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्याने रोपवाटीका स्थापन करण्यास वाव आहे व रोपवाटीका स्थापन केल्यास भाऊसाहेब फुंडकर व महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीकरिता कलमे/रोप यांची गरज भागणार आहे. सबब, तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड येथील प्रक्षेत्राचे शासकीय फळरोपवाटिकेत रुपांतर करण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

१. तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड या प्रक्षेत्राचे शासकीय फळरोपवाटिकेत रुपांतर करावयाचा तपशील

| अ.क्र. | तालुका बीज गुणन केंद्राचे नाव | ता.बि.के.खालील एकूण क्षेत्र (हे.) | फळरोपवाटीकेत रुपांतर करावयाचे (पूर्णत:) क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|
| १ | तालुका बीज गुणन केंद्र कोंडीवते, ता.महाड, जि.रायगड | ९.८४ हे. | ९.८४ हे. |

२.   उपरोक्त तालुका बीज गुणन केंद्राच्या प्रक्षेत्रावर फळरोपवाटिकेत रुपांतर करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) तालुका बीज गुणन केंद्रात असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्याकडूनच नविन फळरोपवाटिकेचे काम करून घेण्यात येईल. सदर फळरोवाटिकेसाठी नविन अधिकारी / कर्मचारी यांची पदनिर्मिती करता येणार नाही.
२) स्थापन करण्यात आलेल्या नविन फळरोपवाटिकेसाठी नव्याने आर्थिक तरतूद करण्याची मागणी करता येणार नाही.
३) नविन वित्तीय भार पडणार नाही, याची दक्षता घ्यावी.
४) प्रक्षेत्रावरील कोणत्याही घटकावर परिणाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३.   उपरोक्त तालुका बीज गुणन केंद्राच्या प्रक्षेत्रावर नव्याने रूपांतर होणाऱ्या फळरोपवाटिकेवर आवश्यक पायाभूत सोयीसुविधा, फळरोपवाटिकेवर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व इतर खर्च यासाठी आवश्यक असणारा निधी मागणी क्र.डी-३, २४०१-पिकसंवर्धन, (०३) रोपमळे (०३)(०१) भाजीपाळा रोपमळे, फळ रोपमळे व स्थानिक उद्याने (२४०१ १७२२) अंतर्गत बाबीखालील उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०२२५१३२२५९३५०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

LALITKUMAR
RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.02.25 13:24:00 +05'30'

**( डॉ.ललितकुमार धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. आयुक्त ( कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक, फलोत्पादन, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
४. विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग, ठाणे
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रायगड.
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा ), मुंबई/नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहसंचालक लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई -३२,
११.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.
१२.निवड नस्ती (१३-अे)